# अर्थमंगल

**आपल्या आर्थिक प्रगतीसाठी समर्पित**



**मा. आ. सुभाष (बापू) देशमुख**

संस्थापक अध्यक्ष, लोकमंगल परिवार

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

**माहे जानेवारी २०२६**






**''पत्रकार बांधवांनी सोलापूरचे ब्रँडिंग व मार्केटिंग देशभरात करावे''**

## कार्यक्रम अहवाल

# ‘आपली पत आपली ओळख’

मंडळी,

नमस्कार

लोकमंगल सहकारी बँकेचं हे मासिक आपल्या हाती देताना आनंद होतोय. हे मासिक प्रकाशित करण्यापाठीमागे कारण हे की आज समाजातील मोठा घटक अजूनही बँकिंगपासून दूर आहे. बँका आपल्या सर्वसामान्यांच्या आर्थिक व्यवहारासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. पण विशेषत: स्त्रिया आणि अल्पशिक्षित व्यक्ती बँकेत व्यवहार करण्यापासून वंचित आहेत. पूर्वी स्त्रिया घरातल्या धान्याच्या डब्यात पैसे साठवायच्या. पण आज काळ बदलला. तुमच्या राहत्या ठिकाणापासून जवळपास एखादी तरी बँक असते. तेव्हा तुमची बचत बँकेत जमा करणं सगळ्याच दृष्टीने उपयुक्त असणार आहे. याच गोष्टीची जाणीव करुन देण्यासाठी, आर्थिक साक्षर करण्यासाठी हे मासिक प्रकाशित करीत आहोत.



पैसे बचत करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. तुमच्याकडे १० रु. असले आणि तुम्ही त्यातला एक रु. बचत करायचं ठरवलं तरी काही काळानंतर तुमच्याकडे बऱ्यापैकी रक्कम उभी राहिल. वर्षभरात रोज १ रु. प्रमाणे बँकेत तुम्ही पैसे जमा केले तर वर्षभरात ३६५ रु. जमा झाले. आता या ३६५ रु. तर काही होत नाही मग बँकेत १००० रू. चे तुम्ही कर्ज मागू शकता. बँकेचा कर्मचारी विचार करेल की अरे ही व्यक्ती वर्षभर न चुकता पैसे बँकेत बचत करत होती. जर इतक्या निगुतीनं ही व्यक्ती पैसे जमा करते आहे तर तितक्याच निगुतीनं ती हे कर्जपण फेडेल. आणि मग तुम्हाला कर्ज मिळेल तुम्ही ते पैसे योग्यठिकाणी वापरून आपली गरज भागवू शकाल नाही का ? एकंदर काय तर बचतीची सवय तुमची पत निर्माण करेल. ही सुरूवात तुम्हाला सामान्य व्यक्तीपासून बँकेचा विश्वासार्ह ग्राहक ह्या ओळखीपर्यंत आणेल.

म्हणूनच विनंती करतो की लहानपणापासून आपल्या मुलांना बचतीची सवय लावा. कारण आज पालक आपल्या मुलांना महिन्याला पाचशे हजार रूपयाचा पॉकेट मनी देतात. तेव्हा त्या पॉकेट मनीतला थोडा भाग जर बँकेत जमा करायला शिकवलं व दिलेल्या पैशाच्या खर्चाचा हिशोब लिहायला सांगितले तर पैशाचं व बचतीचं महत्त्व लहानपणापासून मुलांवर बिंबवलं जाईल. आणि कुठेही कसाही पैसा वापरण्यावर नकळत त्याच्याकडून विचार व्हायला लागेल.

या सगळ्याचा विचार करूनच आर्थिक बाबींशी सगळ्यांनी डोळसपणे कनेक्ट व्हावं म्हणून हे ‘अर्थमंगल’. सगळ्यांचा आर्थिक स्तर सुधारावा, सगळ्यांच्या आयुष्यात नेहमीच मंगल व्हावं. ही प्रार्थना करतो आणि इंग्रजी नववर्षाच्या शुभेच्छा देतो आणि नियमित बचतीला या नववर्षात सुरूवात कराल ही अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

तुमचा

**सुभाष देशमुख**

# लोकमंगल बँकेतर्फे पत्रकार दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न पत्रकार बांधवांनी सोलापूरचे ब्रँडिंग व मार्केटिंग देशभरात करावे :- आमदार सुभाष बापू देशमुख

लोकमंगल बँकेच्या वतीने पत्रकार दिनाच्या औचित्य साधून बँकेच्या प्रधान कार्यालयात सोलापुरातील विविध पत्रकार बांधवांचा सन्मान व सत्कार लोकमंगल परिवाराचे सर्वेसर्वा तथा लोकमंगल बँकेचे अध्यक्ष आमदार **सुभाष बापू देशमुख** यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष **श्री मनीष केत,** श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार **श्री सागर सुरवसे,** लोकमंगल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **श्री राजेशसिंह बायस** यांची उपस्थिती होती. प्रारंभी पत्रकार बांधवांच्या हस्ते लोकमंगल बँकेच्या अर्थमंगल मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविकात बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **श्री राजेशसिंह बायस** यांनी बँकेची वाटचाल सध्या शेड्युल्ड बँकेकडे जात असल्याचे प्रतिपादन केले. **श्री मनीष केत** यांनी पत्रकार बांधवांचे सन्मान केल्याबद्दल लोकमंगल परिवाराचे आभार व्यक्त करून पत्रकार बांधवांच्या परिवार करिता बँकेमार्फत अर्थसहाय्य करून सोलापुरातील पत्रकारांच्या कुटुंबीयांना आर्थिक सक्षम करण्याचे मागणी केली. बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांनी पत्रकारांच्या कार्याचे कौतुक करून पत्रकार बांधवांनी सोलापूर शहर व जिल्ह्याचे ब्रँडिंग व मार्केटिंग महाराष्ट्र राज्यात व देशभरात करावे असे प्रतिपादन केले. लोकमंगल परिवार पत्रकार बांधवांच्या सदैव पाठीशी असेल अशी ग्वाही दिली. सदर कार्यक्रमास लोकमंगल बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात खालील पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला.

१. मनिष केत – प्रदेशाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ
२. सागर सुरवसे , ब्युरो चीफ TV9 मराठी :
३. आफताब शेख , ABP माझा जिल्हा प्रतिनिधी
४. प्रीतम पंडित, जिल्हा प्रतिनिधी News 18 लोकमत
५. वसीम अत्तार, जिल्हा प्रतिनिधी लोकशाही न्यूज
६. अभिषेक आदेप्पा , जिल्हा प्रतिनिधी झी २४ तास
७. विश्वभूषण लिमये, जिल्हा प्रतिनिधी साम टीव्ही
८. अनिकेत गायकवाड, पुढारी न्यूज
९. सौरभ वाघमारे ,जिल्हा प्रतिनिधी NDTV
१० अनिल कांबळे, महापोस्ट न्यूज, सोलापूर
११. दिनेश शिंदे , इन सोलापूर न्यूज, सोलापूर
१२.श्री उमेश कदम, पत्रकार दैनिक दिव्य मराठी, सोलापूर
१३. अय्युब कागदी, कॅमेरामॅन, ABP माझा न्युज, सोलापूर
१४. विनोद हुमनाबादकर , कॅमेरामॅन TV9 मराठी




पत्रकार दिन
समारंभ
Galaxy A55 5G


पत्रकार दिन
समारंभ


पत्रकार दिन
समारंभ
सर्वांचे हार्दिक स्वागत
Galaxy A55 5G



# लोकमंगल बँकेतर्फे नववर्षानिमित्त विविध प्रशासकीय कार्यालयास सदिच्छा भेटी देऊन बँकेचे कॅलेंडर भेट

लोकमंगल बँकेतर्फे नववर्षानिमित्त विविध प्रशासकीय कार्यालयास सदिच्छा भेटी देऊन बँकेचे कॅलेंडर भेट देऊन नववर्षाच्या शुभेच्छा देण्यात आले

लोकमंगल बँकेच्या वतीने नूतन वर्षानिमित्ताने फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री महादेव राऊत, सोलापूर महानगरपालिका विभागीय कार्यालय क्रमांक.१ च्या विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ एसटी नियंत्रण कार्यालय नियंत्रक **श्री अमोल गोंजारी,** नवी पेठ व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्री **अशोक मुळीक** यांची सदिच्छा भेटी घेऊन आपल्या बँकेचे कॅलेंडर भेट देऊन नवीन वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.














# लोकमंगल दिनदर्शिका २०२६ प्रकाशन सोहळा संपन्न

बार्शी :- लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर शाखा-बार्शी यांच्या वतीने लोकमंगल दिनदर्शिका प्रकाशन सोहळा पालक संचालक **जॉन चोप्रा साहेब** यांच्या हस्ते संपन्न झाला. या वेळेस उपस्थित बार्शी मराठा सेवा संघांचे अध्यक्ष **श्री. दिलीप सुरवसे** व बँकेचे ग्राहक तसेच शाखा व्यवस्थापक **श्री. प्रविण भोसले,** विभागीय अधिकारी **सुभाष पेटकर** व सर्व स्टाफ उपस्थित होते.




# सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त अभिवादन

जिल्हा परिषद शाळा माढा येथील विद्यार्थ्यांनी अन्नपूर्णा योजनेसाठी एक मूठ धान्य गोळा केले होते. ते आज मुख्याध्यापक **खेडेकर** सरांनी आपल्याला काल सुपूर्त केले आहे यामध्ये गहू ज्वारी तांदूळ याचा समावेश आहे साधारण तीन क्विंटल धान्य गोळा झालेले आहेत.



## सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त अभिवादन

आज ३ जानेवारी भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका व थोर समाजसेवक सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे बँकेचे संचालक **श्री अशोक सापटणेकर** यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले, याप्रसंगी बँकेचे प्रभारी शाखाअधिकारी **धर्मराज मळगे,** ऑडिटर **संजय दोडतले, सौ अनिता जगदाळे** व बँकेतील अधिकारी कर्मचारी वर्ग याप्रसंगी उपस्थित होते.



## लोकमंगल बँक मध्ये राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब जयंती दिनी अभिवादन

सांगोला - लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा सांगोला यांच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

बँकेचे शाखा सल्लागार **गिरीष ( भाऊ ) नष्टे** यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी शाखा व्यवस्थापक **श्री शिवाजी देरेकर** व सर्व स्टाफ उपस्थित होते.



# प्रभाग क्रमांक ५ मध्ये लोकमंगल परिवार व प्रसन्न ग्लोबल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. सोनाली घोंगडे यांचे महिलांना आरोग्यविषयक व आहार विषयक मार्गदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल परिवाराच्या वतीने प्रभाग क्रमांक ५ मधील वसंत विहार परिसरातील प्रसन्न हॉल येथे लोकमंगल परिवार व प्रसन्न ग्लोबल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलांसाठी आहार विषयक व आरोग्य विषयक **डॉ सोनाली घोंगडे** यांचे मार्गदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पतंजली योग समितीच्या प्रमुख योग प्रशिक्षिका **सौ सुधा अळ्ळीमोरे,** प्राचार्या **दिपाली पवार** उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ ज्योती सुरवसे यांनी केले. प्रस्ताविकामध्ये लोकमंगल परिवाराच्या ग्राहकांसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजना उपस्थित महिलांना सांगितल्या. **डॉ. सोनाली घोंगडे** यांनी उपस्थित महिलांना आपल्या दैनंदिन जीवनात आपल्या आरोग्याची व आहाराची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. आपले आहार कसे असले पाहिजे त्याचा उपयोग आपल्या शरीरासाठी कसा होतो याविषयीचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **सौ श्रद्धा कुलकर्णी** यांनी केले व आभार सौ साधना डोंगरे यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता लोकमंगल परिवारातील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




लोकमंगल परिवार
व
ग्लोबल स्कूल
आहार व आरोग्यविषयक मार्गदर्शन




लोकमंगल परिवार
व
ग्लोबल स्कूल
संयुक्त विद्यमाने
आरोग्यविषयक मार्गदर्शन
मार्गदर्शक
आहारतज्ञ)

# सदिच्छा भेट

**मा.श्री सियोल उल्के,** व्यवस्थापक, आरबीआय (DOS) नागपूर यांची सोलापूर येथे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **श्री राजेशसिंह बायस** यांनी सदिच्छा भेट घेऊन आपल्या बँकेतर्फे सत्कार व सन्मान केला.



महाराष्ट्र पर्यटन विभाग कार्यालय पुणे येथील कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक श्री हनुमंत हेडे साहेब यांची सदिच्छा भेट घेऊन वर्धापन दिनानिमित्त आपल्या बँकेतर्फे शुभेच्छा देऊन सविस्तर चर्चा केली



# लोकमंगल बँकेच्या वतीने आई पर्यटन योजनेअंतर्गत व्यावसायिक कर्ज व महिला उद्योजिका मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

## श्री क्षेत्र आळंदी येथे लोकमंगल बँकेच्या वतीने ५०० महिला उद्योजिका घडविणार - ह.भ.प श्री पुरुषोत्तम महाराज पाटील विश्वस्त, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी

बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल बँकेच्या वतीने श्री क्षेत्र आळंदी येथे आई पर्यटन योजनेअंतर्गत व्यावसायिक कर्ज व उद्योजक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी आई कर्ज योजनेअंतर्गत महिलांना टूर्स अँड ट्रॅव्हल्स व्यवसायकरिता वाहन कर्जाचे चावी प्रदान सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच या योजनेअंतर्गत कर्जाचे चेक वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून **श्री भरत लांघी,** उपसंचालक पर्यटन संचालनालय पुणे तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त **ह.भ.प श्री पुरुषोत्तम महाराज पाटील,** पर्यटन विभागाचे प्रकल्प अधिकारी **श्री मयूर नांद्रे,** लोकमंगल बँकेचे उपाध्यक्ष **श्री प्रदीप नागणे,** लोकमंगल पतसंस्थेचे संचालक **श्री शिवाजी माळी** आदी उपस्थित होते.

पर्यटन संचालनाचे उपसंचालक **श्री भरत लांघी** यांनी आई पर्यटन योजनेअंतर्गत विविध शासकीय माहिती उपस्थित महिलांना व ग्राहकांना दिली तसेच लोकमंगल बँकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिला उद्योजिका घडवावे याकरिता पर्यटन संचानालय संपूर्ण सहकार्य करेल असे मनोगत व्यक्त केली. बँकेचे उपाध्यक्ष **श्री प्रदीप नागणे** यांनी लोकमंगल परिवार व लोकमंगल बँकेची सविस्तर माहिती उपस्थित सर्वांना दिली. कार्यक्रमास श्रीक्षेत्र आळंदी परिसरातील ग्राहक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता लोकमंगल बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.












लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर
शाखा हडपसर पुणे
आयोजित
AAi
"आई" महिला केंद्रित पर्यटन धोरण
व्यावसायिक कर्ज व उद्योजक मार्ग
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. प्रदिप नागणे
चौधरी मंडप डेकोरेटर्स
9767979668/8087971000

# प्रभाग क्रमांक ६ मध्ये लोकमंगल परिवार मार्फत पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार व सन्मान

आमदार सुभाष बापू साहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल परिवाराच्या वतीने प्रभाग क्रमांक ६ मधील दमानी नगर येथील लोकमंगल पतसंस्थेच्या कार्यालयात परिसरातील पत्रकार बांधवांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सदर परिसरातील सल्लागार खातेदार व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोकमंगल बँक सांगोला शाखेच्या वतीने पत्रकारांचा सन्मान

सांगोला - लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक शाखा सांगोला यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा गौरव करण्यात या कार्यक्रमात माणदूत एक्सप्रेसचे संपादक **मोहन मस्के,** दैनिक लोकमतचे **अरुण लिगाडे,** दैनिक स्वराज्याचे **निसार तांबोळी,** सांगोला नगरीचे **विनोद चंदनशिवे** आदींचा माननीय संचालक **विजय कुलकर्णी** साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास स्थानिक सल्लागार Adv. **गजानन भाकरे साहेब गिरीश (भाऊ) नष्टे अच्युत फुले साहेब** इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी Adv. गजानन भाकरे साहेब पत्रकार **अरुण लिगाडे** यांनी मनोगत व्यक्त केले. शाखा व्यवस्थापक **श्री दरेकर साहेब** यांनी स्वागत व आभार प्रदर्शन केले.





# माँसाहेब जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती

स्वराज्याचे स्वप्न ज्यांनी साक्षात उतरवले शिवबांना प्रेरणा दिली आणि संस्काराच्या शिदोरीवर स्वराज्याची स्थापना केली अशा हिंदवी स्वराज्याच्या जननी राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले




आज लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक मुख्य शाखा येथे राष्ट्रमाता माँ जिजाऊ व थोर पुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन बँकेचे  ठेवीदार डॉक्टर **श्री मोहिते** यांच्या उपस्थितीत संपन्न झाले याप्रसंगी शाखाधिकारी धर्मराज मळगे, अधिकारी **अनिता जगदाळे, अरविंद झांबरे, रमेश असंगे, परमेश्वर जाधव** इतर कर्मचारी सहकारी उपस्थित होते.

.



# वृक्षारोपण कार्यक्रम

लोकमंगल परिवार आयोजित प्रभाग क्रमांक एक मध्ये  आज दि.१ जानेवारी २०२६ रोजी पोपल वस्ती, तुळजापूर रोड जिल्हा परिषद शाळे जवळ वृक्षारोपण कार्यक्रम व कॅलेंडर वाटप कार्यक्रम सकाळी संपन्न झाला , प्रथमतः  डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर , माता जिजाऊ , माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व लोकमंगल परिवाराची संपूर्ण माहिती **श्रद्धा कुलकर्णी** यांनी दिली याप्रसंगी प्रभागातील  **प्रकाश चंदनशिवे, संतोष चंदनशिवे, लखन चंदनशिवे, राहुल गाडे, अशोक चंदनशिवे, किशोर गायकवाड,** पोपल वस्ती येथील नागरिक, महिला व लोकमंगल परिवारातील कर्मचारी उपस्थित होते.







# लोकमंगल परिवार हळदी कुंकू आणि
# तिळगुळ वाटप कार्यक्रम प्रभाग क्रमांक २४

दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी आदरणीय सुभाष बापू देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये मंत्री चंडक विजापूर रोड येथे अतिशय उत्साहात पार पडला

सदर कार्यक्रमाला आ.सुभाष बापू देशमुख, लोकमंगल पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन निर्मला कुंभार मॅडम, लोकमंगल पतसंस्थेच्या संचालिका सौ.टीपे मॅडम आणि सौ.नडगिरी मॅडम व लोकमंगल परिवाराचा सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होता.

सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वैशाली भोसले मॅडम, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मिलिंद घाडगे, संरक्षण आधिकरी, आनंद ढेपे Childline समन्वयक नितीन थोरात, महिला बाल विकास विभाग अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मीनाक्षी पाटील यांनी केले. सूत्रसंचालन श्रद्धा कुलकर्णी यांनी तर आभार सौ अनिता जगदाळे यांनी व्यक्त केले.












# लोकमंगल कर्मचारी स्नेहसंवाद : एकजुटीतून समाज व जिल्हा समृद्धीचा संकल्प

लोकमंगल परिवार आयोजित लोकमंगल कर्मचारी स्नेहसंवाद कार्यक्रमास परिवाराचे प्रमुख आमदार सुभाष बापू देशमुख सर्वांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात लोकमंगल परिवारातील सदस्यांनी विविध विषयांवर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये वित्तीय संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांचा विश्वास जपणे, ग्राहकांचे हित जोपासणे, लहान योगदान – मोठे यश, डिजिटल मार्केटिंग, व्यवसाय वाढ व ग्राहक जोडणी, तसेच समाजासाठी लोकमंगल परिवाराची भूमिका यावर विचार मांडण्यात आला.

सोलापूर जिल्हा समृद्ध करण्यासाठी सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून ५ P च्या आधारावर करण्यात येणाऱ्या कार्याची सविस्तर मांडणी करण्यात आली.

यावेळी संस्थेचे मार्गदर्शक **आ. सुभाष बापू देशमुख** बोलताना म्हणाले की, लोकमंगल परिवाराच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकासाठी प्रभावी काम केले जाते. सोलापूर शहर व जिल्ह्यात विविध ठिकाणी स्नेहसंवाद कार्यक्रम राबवून नागरिकांशी थेट संवाद साधता आला. पुढील काळात सोलापूर शहरातील सर्व प्रभाग व जिल्ह्यातील प्रत्येक गावात दर महिन्याला लोकमंगल परिवाराच्या वतीने एक सामाजिक कार्यक्रम घेण्याबाबत चर्चा करण्यात आली.

सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांसाठी लोकमंगल परिवार सातत्याने कार्यरत असून, येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो. लोकमंगल परिवाराच्या माध्यमातून एकजुटीने काम केल्यास सोलापूर जिल्हा निश्चितच सुजलाम–सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तालुका ते गावस्तरावर समित्या स्थापन करून वर्षभर दर महिन्याला सामाजिक उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच लोकमंगल परिवारातील सर्व सहकाऱ्यांच्या वैयक्तिक अडचणींसाठी लोकमंगल परिवार सदैव सोबत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकमंगल परिवारातील वित्तीय संस्था, महाविद्यालये, फाउंडेशन आदी विविध संस्थांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, उद्योजक घडवणे, कुटुंबांना आर्थिक सक्षम करणे, महिला उद्योजक तयार करणे, जिल्ह्याचा शैक्षणिक स्तर उंचावणे आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्रितपणे कार्य करण्याबाबत आवाहन केले.

या कार्यक्रमास लोकमंगल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेशसिंह बायस, मल्टीस्टेट सीईओ श्री सचिन जाधव, सोलापूर सोशल फाउंडेशनचे मुख्य समन्वयक **विजय पाटील,** लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे **संजय बागल** यांच्यासह लोकमंगल परिवारातील अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# लोकमंगल बँकेच्या वतीने राज्य राखीव पोलीस दल क्रमांक. १० (SRP कॅम्प)
# येथे कर्ज विषयक मार्गदर्शन शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विजापूर रोडवरील राज्य राखीव पोलीस दल क्रमांक. १० (**SRP** कॅम्प) येथील प्रांगणात लोकमंगल बँकेच्या वतीने विविध शासकीय व्याज परतावा योजनेची कर्ज विषयक मार्गदर्शन शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री एस. के. अरुंदेकर ( असिस्टंट कमांडर )

**श्री दिलीप तडाखे** (पी. आय )

**श्री मारुती जगलपुरे** (पी. आय)

**श्री तुषार साळुंके** (**PSI**) आदींची प्रमुख उपस्थित होते. बँकेचे अधिकारी **सुदन सुरवसे** यांनी विविध महामंडळाचे व्याज परतावा कर्ज योजनेचे सविस्तर माहिती उपस्थित पोलिस बांधवांना दिले तसेच आई पर्यटन कर्ज योजनेची सविस्तर माहिती दिली व सर्व व्याज परतावा कर्ज योजनेचा लाभ पोलीस बांधवाच्या कुटुंबियांनी घ्यावा असे आवाहन बँकेचे वतीने करण्यात आले. तसेच बँकेच्या नववर्ष निमित्ताने ठेव योजनेची माहिती दिली व सर्वांना सभासद होण्याचे आवाहन बँकेच्या वतीने याप्रसंगी करण्यात आले.**सौ श्रद्धा कुलकर्णी** यांनी लोकमंगल परिवारातील विविध सामाजिक उपक्रमाची माहिती दिली तसेच लोकमंगल पतसंस्थेच्या महिला सन्मान आवर्तक ठेव योजनेची माहिती उपस्थित बांधवांना देऊन या सर्व योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. याप्रसंगी उपस्थित अधिकारी यांनी येणाऱ्या काळात सर्व पोलीस कुटुंबीयांचा व परिवारातील सदस्यांचा कॅम्प घेऊन सर्वांना बँकेच्या विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असे सांगितले. सदर कार्यक्रमास पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# मकरसंक्रांतीनिमित्त तिळगुळ वाटपाचा उपक्रम उत्साहात

आज लोकमंगल परिवारातर्फे सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक २६ येथे मकरसंक्रांतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम लोकमंगल परिवार व समूहामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच लोकमंगल परिवारातील सामाजिक उपक्रमांची माहिती **सौ श्रद्धा कुलकर्णी** यांनी दिली. लोकमंगल परिवारातील कर्मचारी **श्री गंगाराम सुरवसे, प्रवीण आवताडे, नितीन सपकाळे वल्लभ वसेकर अभिजीत शिंदे, वैभव विजय सुरवसे, बोधले नागेश, वैभव सुरवसे आणि सौ रेणुका पंचाक्षरी, सौ कल्पना गायकवाड, सौ माधुरी भोसले, सौ मयुरा अवताडे, सौ श्रुती शिंदे** इत्यादी या सर्व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने आणि कल्याण नगर भाग एक मध्ये सर्व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

लोकमंगल परिवारामार्फत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी व उत्साही वातावरणात संपन्न झाला.

**तिळगुळ घ्या, गोड गोड बोला – सामाजिक एकोप्याचा उपक्रम!**





# लोकमंगल बँकेच्या प्रधान कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एच एस गुजरे सर हे होते. यावेळी लोकमंगल बँकेचे संचालक माननीय **श्री प्रल्हाद कांबळे, सौरभ अंबुरे, सिद्धार्थ सर्जे,** आपल्या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय **श्री राजेश सिंह बायस** बोर्ड मॅनेजमेंट चे **जाजु सर** लोकमंगल बँकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्रद्धा कुलकर्णी** यांनी केले









# विविध शाखेमार्फत वाहन कर्ज वितरण

लोकमंगल कॉपरेटिव बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत विठाई टूर्स अँड ट्रॅव्हल्स **(प्रो सौ पुष्पा संभाजी काळे)** यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत ओरा गाडीसाठी कर्ज अदा करून आपल्या बँकेचे सभासद व खातेदार माननीय **श्री दत्तात्रय देशमुख साहेब** (PSI) यांच्या हस्ते चावी प्रदान करण्यात आले. यावेळी पूजन करताना स्वतः मालक व कर्मचारी वर्ग.




सह्याद्री टूर्स अँड ट्रॅव्हल्स **(प्रोप्रायटर:–प्रमोद शिंदे)** अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत टुर्स व ट्रॅव्हल्स व्यवसायासाठी १० लाख चार हजार वाहन साठी कर्ज वाटप केले.

बँकेसमोर गाडी पूजेसाठी आणली होती, त्यावेळेस शाखा व्यवस्थापक **श्री. धर्मराज मळगे, अनिता जगदाळे** व शाखेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



लोकमंगल बँक शाखा अक्कलकोट मार्फत मणियार टूर ट्रॅव्हल्स, प्रो. प्रा. **रजियाबी चि. मणियार** यांना आई योजने अंतर्गत डिझायर टूर एस वाहन कर्ज वितरण प्रसंगी बँकेचे अधिकारी व कर्मचारी वृंद




लोकमंगल को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा हडपसर पुणे मार्फत शाखेचे कर्जदार श्री टूर्स अँड ट्रॅव्हल्स **(प्रो सौ भाग्यश्री श्रीकांत बांगर)** यांना आई पर्यटन योजनेअंतर्गत ईरटीका गाडीसाठी कर्ज अदा करून आज बँकेसमोर पूजन करताना स्वतः मालक व कर्मचारी वर्ग.



लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर
शाखा:- मुख्य शाखा
१) व्यवसायाचे नाव: -राजलक्ष्मी टुर्स ट्रॅव्हल्स
कर्जदाराचे नाव :-सौ.लश्मी राजु बळुरगी सोलापुर
योजना:- महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग अंतर्गत आई योजना मध्ये
कर्ज रक्कम: - ८,७५,०००/-

२) व्यवसायाचे नाव:- श्री रेवनसिद्धेश्वर टूर्स अँड ट्रॅव्हल्स
कर्जदाराचे नाव:- सुहासिनी रविकांत पाटील
योजना:- योजना:- महाराष्ट्र शासन आई पर्यटन योजना
कर्ज रक्कम :- ७,०६,०००/-

३) व्यवसायाचे नाव:- श्री रेवनसिद्धेश्वर टूर्स अँड ट्रॅव्हल्स
कर्जदाराचे नाव:- अंजली रेवनसिद्ध थोरात
योजना:- महाराष्ट्र शासन आई पर्यटन योजना
कर्ज रक्कम:- ७,०६,०००/-

आज लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे ३ वाहनाचे पूजन व चावी प्रदान कार्यक्रम बँकेचे समवर्ती लेखापरीक्षक सी ए श्री गणेश पावले सर, प्र. शाखाधिकारी धर्मराज मळगे व अधिकारी सौ अनिता जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते





लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर शाखा:- मुख्य शाखा
योजना:- महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग अंतर्गत आई योजना मध्ये व्यवसायाचे नाव: - आशाबाई टूर्स अँड ट्रॅव्हल्स, वडकबाळ दक्षिण सोलापूर कर्जदाराचे नाव :- **घडेराव आशाबाई दत्ता**
कर्ज रक्कम: -३,५७,०००/- आज लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे (वाहन नाव) पूजन व चावी प्रदान बँकेचे शाखाधिकारी. **श्री धर्मराज मळगे** व अधिकारी. **अनिता जगदाळे** मॅडम, **पुरुषोत्तम शिंदे, रमेश आसंगे** यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर
शाखा:- मुख्य शाखा कर्जदाराचे नाव :- शंकर खंडाप्पा हार्डीकर कर्ज रक्कम: -२,४९,०००/- लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे रिक्षाचे पूजन व चावी प्रदान बँकेचे शाखाधिकारी. **श्री धर्मराज मळगे व अधिकारी पुरुषोत्तम शिंदे** यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



शाखा:- मुख्य शाखा, योजना:- महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग अंतर्गत आई योजना मध्ये, व्यवसायाचे नाव: - त्रिमूर्ती टूर्स अँड ट्रॅव्हल्स. कर्जदाराचे नाव :- सौ सोनाली भोसले

कर्ज रक्कम: - १५ लाख लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे वाहन पूजन व चावी प्रदान बँकेचे शाखाधिकारी. **श्री धर्मराज मळगे,** बँक ग्राहक **प्रशात जाधव** (सरपंच गंगेवाडी ) व अधिकारी. **अनिता जगदाळे** मॅडम, यांच्या हस्ते करण्यात आली , याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



सह्याद्री टूर्स अँड ट्रॅव्हल्स (प्रोप्रायटर:- **प्रमोद शिंदे** अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत टुर्स व ट्रॅव्हल्स व्यवसायासाठी १०लाख चार हजार वाहन साठी कर्ज वाटप केले.

बँकेसमोर गाडी पूजेसाठी आणली होती, त्यावेळेस शाखा व्यवस्थापक **श्री. धर्मराज मळगे, अनिता जगदाळे** व शाखेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सोलापूर, शाखा:- मुख्य शाखा, कर्जदाराचे नाव :- शंकर खंडाप्पा हार्डीकर कर्ज रक्कम: -२,४९,०००/-आज लोकमंगल बँक मुख्य शाखा येथे रिक्षाचे पूजन व चावी प्रदान बँकेचे शाखाधिकारी. **श्री धर्मराज मळगे** व अधिकारी **पुरुषोत्तम शिंदे** यांच्या हस्ते करण्यात आला, याप्रसंगी बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



## वर्तमानपत्रातून प्रसिध्दी...!

# पुण्य नगरी

## लोकमंगल कर्मचारी स्नेहसंवाद बैठक उत्साहात



**सोलापूर / प्रतिनिधी**

येथील द हेरिटेज लॉन्स येथे लोकमंगल परिवार आयोजित कर्मचारी स्नेहसंवाद बैठक उत्साहात पार पडली. या कार्यक्रमास लोकमंगल परिवाराचे संस्थापक अध्यक्ष आ. सुभाष देशमुख यांची उपस्थिती होती.

आ. देशमुख म्हणाले की, लोकमंगल परिवारातील प्रत्येक कर्मचारी हा आमच्या कुटुंबाचा एक महत्त्वाचा घटक असून त्यांच्या कोणत्याही अडचणीमध्ये मी ठामपणे त्यांच्या पाठीशी आहे. कर्मचाऱ्यांचे हित आणि प्रगती हाच माझा प्रथम ध्यास आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी समजातील लोकांच्या गरजा ओळखून लोकमंगल परिवारमार्फत शहरातील सर्व प्रभागामध्ये दररोज एका प्रभागात एक सामाजिक कार्यक्रम राबवून समाजाशी नाळ घट्ट ठेवावी, असेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात लोकमंगल परिवरातील अनिता जगदाळे यांनी व्यवसाय वाढ व ग्राहक जोडणी, सतीश लोंढे यांनी प्रामाणिकपणाचे महत्त्व, सुदन सुरवसे यांनी ग्राहकांचे हित जोपासणे का महत्त्वाचे आहे, बसवराज बिराजदार यांनी वेळेचे महत्त्व व दत्तात्रय माळी यांनी नियोजनाचे महत्त्व व त्यामागील उद्देश याविषयी सविस्तर मांडणी केली. राहुल कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सदर कार्यक्रमांमध्ये लोकमंगल परिवाराच्या क्रिकेट संघाने कोपरगाव येथे झालेल्या सुधन प्रीमियर लीग मध्ये विजेतेपद पटकावल्यामुळे संघातील सर्व खेळाडूंचा आमदार देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीस पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस, पतसंस्थेच्या सरव्यवस्थापिका अलका देवडकर, मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन जाधव, लोकमंगल फाउंडेशनच्या दिपाली कोठारी, कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमन सरोजनी निकम आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन श्रद्धा कुलकर्णी यांनी केले.

# लोकमंगल बँक

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, दक्षिण सोलापूर.

## तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

१०००० उद्योजक निर्मितीचा संकल्प

### * महाराष्ट्र शासनाचा उपक्रम *

महामंडळ अंतर्गत ३०० कोटी कर्ज वाटप उद्दिष्टपूर्ती

# १२% व्याज परतावा कर्ज योजना

सर्व प्रकारच्या व्यवसायाकरिता बँकेकडून आर्थिक साहाय्य

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**अण्णासाहेब पाटील**
आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत



महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ**

कमाल कर्ज मर्यादा रक्कम
**रू. १५ लाख**

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय**
वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित
उपकंपनी – शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत



महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
**वसंतराव नाईक**
विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ (मर्यादित) अंतर्गत





**सर्व प्रकारच्या अन्न प्रक्रिया व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध.**
**प्रधानमंत्री फुड प्रोसेसिंग योजने अंतर्गत ३५% पर्यंत सबसीडी**

**पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण**
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
'आई' महिला केंद्रित पर्यटन धोरण अंतर्गत
**व्याज परतावा योजना**
(फक्त महिलांसाठी)

MAHARASHTRA TOURISM





कमाल कर्ज मर्यादा रक्कम
**रू. १५ लाख**



### वैशिष्ट्ये

* व्यवसाय विस्तार / वाढीसाठी कर्ज * नवीन व्यवसाय उभारणीसाठी कर्ज * कमीत कमी कागदपत्रे व त्वरीत कर्ज मंजुरी

### आवश्यक कागदपत्रे

* आर्थिक विकास महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र * व्यवसायाचे सर्व नोंदणीपत्र * उत्पन्नाचे पुरावे
* आधारकार्ड, पॅन कार्ड, लाईट बील * दोन सक्षम जामीनदार * तारण देणाऱ्या मिळकतीची कागदपत्रे * प्रोजेक्ट रिपोर्ट
* जुना व्यवसाय असल्यास मागील ३ वर्षाचे आर्थिक ताळेबंद पत्रक * नवीन व्यवसाय असल्यास पुढील ५ वर्षाचे प्रोजेक्शन
* चालू बँक खात्याचा १ वर्षाचा खाते उतारा * लोकमंगल बँकेच्या नियम व अटीनुसार कर्ज देण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा**

# लोकमंगल बँक

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, दक्षिण सोलापूर.

## तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

### * ठेवीवरील आकर्षक व्याजदर *

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| ७ दिवस ते ४५ दिवस | ३.५०% |
| ४६ दिवस ते १७९ दिवस | ४.००% |
| १८० दिवस ते २१० दिवस | ४.५०% |
| २११ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी | ६.००% |
| १ वर्षी ते २ वर्षापेक्षा कमी | ७.५०% |
| २ ते ३ वर्ष | ७.७५% |
| ३ वर्षापेक्षा जास्त | ७.००% |
| बचत खातेसाठी | २.५० % |
| दामदुप्पट | १२० महिने |

**ज्येष्ठ नागरिकांना**
**अर्धा टक्का ज्यादा व्याज**

**३६५ दिवस अविरत सेवा**




लॉकर सुविधा उपलब्ध

**अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा**



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, द. सोलापूर.

# लोकमंगल बँक

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

## तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

**योजने अंतर्गत (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**₹ १५ लाखापर्यंत कर्जास**
**0%* व्याजदर** (* नियम व अटी लागू)

## सर्व प्रकारच्या व्यवसाय वाढीसाठी व व्यावसायिक वाहन खरेदीकरिता

### वैयक्तीक व्याज परतावा योजना (IR-1)

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* या योजनेची मर्यादा रू. १ लाख ते १५ लाखापर्यंत आहे.
* १५ लाखाच्या कर्जास ४.५ लाख व्याज परतावा करण्यात येतो.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.
* व्याज परतावा जास्तीत जास्त १२% दिला जातो.

### कर्ज कोणाला -

* कृषी सलंग्न पारंपारिक उपक्रमासाठी
* लघु मध्यम उद्योगासाठी
* उत्पादन, व्यापार, विक्री व सेवाक्षेत्रासाठी
* सदर कर्ज योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरिता आहे.
* उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असणे अनिवार्य आहे.
* कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे.
* या योजनेत नवीन व्यवासाय सुरूवात करण्यासाठी व सध्या सुरू असलेला व्यवसाय - उद्योगवाढीसाठी घेतलेल्या कर्जास व्याजाचा परतावा दिला जातो.

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे -

* सध्या राहत असलेल्या ठिकाणाचा पुरावा. * आधारकार्ड दोन्ही बाजू झेरॉक्स
* पॅनकार्ड * रेशनकार्ड दोन्ही बाजूस * कुटुंबाचा उत्पन्नाचा तहसिल दाखला
* हिंदू मराठा असा उल्लेख असलेला जातीचा दाखला (तहसिलदार)
* आधार व पॅनकार्ड वरील जन्मतारीख एकसारखी असावी.

### गटप्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-2)

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एलएलपी कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.
* या योजनेअंतर्गत किमान १ किंवा २ पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटांनी एकत्र येऊन

▸ दोन व्यक्तींसाठी कमाल रू. २५ लाखांच्या मर्यादेवर
▸ तीन व्यक्तींसाठी रू. ३५ लाखांच्या मर्यादेवर
▸ चार व्यक्तींसाठी रू. ४५ लाखांच्या मर्यादेवर
▸ पाच व पाचपेक्षा अधिक व्यक्ती असल्यास रू. ५० लाखांपर्यंतचा
▸ व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यंत १२% व्याज परतावा दिला जातो.

या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

* जास्तीत जास्त रू. १५ लाखापर्यंत व्याज रकमेचा परतावा.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.

## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख

# लोकमंगल बँक

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.

फोन : (०२१७) २७३५५०३/६६

AAi

## तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

₹१५ लाखापर्यंतच्या कर्जास

१२%* व्याज परतावा

* नियम व अटी लागू

DIRECTORATE MAHARASHTRA TOURISM

AAi

पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम







'आई' महिला केंद्रित पर्यटन धोरण अंतर्गत

### व्याज परतावा योजना (फक्त महिलांसाठी)

* कृषी पर्यटन केंद्र * हॉटेल व्यवसाय * रेस्टॉरंट * कॅफे * निवास न्याहरी * बेकरी * टूर मार्गदर्शक * ट्रॅव्हल एजंट
* टूर ऑपरेटर * टूर ॲण्ड ट्रॅव्हल एजन्सी * आयुर्वेद * योगा केंद्र * हाऊस बोट * टेंट हाऊस * पर्यटन व्हीला
* साहसी पर्यटन केंद्र * पर्यटन सुविधा केंद्र * होम स्टे * रिसॉर्ट * ट्री हाऊस * इतर पर्यटन व्यवसाय* ई व्हेईकल
* मेडीकल पर्यटन * वेलनेस सेंटर * हॅण्ड क्राफ्ट * आर्ट ॲण्ड कल्चर * स्थानिक उत्पादन विक्री केंद्रे
* धार्मिक स्थळी निर्माल्य* उपहार गृह * फास्ट फूड * महिला चलित कॉमन किचन * प्रसाद विक्री केंद्र
* खाद्यपदार्थ विक्रेते * ईव्हेंट मॅनेजमेंट






महिला सक्षमीकरणासाठी हॉटेल व्यवसाय व टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व्यवसायासाठी व पर्यटन विभागाशी निगडीत असलेल्या सर्व व्यवसायाकरिता कर्ज उपलब्ध

कमाल कर्ज मर्यादा रक्कम

**रू. १५ लाख**

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे

* आधारकार्ड झेरॉक्स दोन्ही बाजू * पॅन कार्ड प्रत * शॉप ॲक्ट / उद्यम आधार यामध्ये महिला कामगार संख्या ५०% पेक्षा अधिक असावे. * सदर व्यवसाय महिलांच्या मालकी हक्काचे असल्याचे दर्शविण्यासाठी १०० रू. स्टँम्प पेपरवर रितसर नोटरी प्रतिज्ञापत्र जोडावे. * अन्न व औषध प्रशासन परवाना (खाद्य व्यवसायासाठी अनिवार्य). * जीएसटी क्रमांक (आवश्यकतेनुसार) * रद्द केलेला एक चेक * प्रकल्प संकल्पना (५०० शब्दात).

### कर्ज मंजुरी पत्र अपलोड करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

* बँक कर्ज मंजुरी पत्र * कर्ज रिपेमेंट शेड्युल / हप्ते पत्र * कर्ज खाते उतारा. * बँकेकडील कागदपत्रांवर बँकेचा सही शिक्का असणे आवश्यक आहे. * बचत खात्याचे चेक * गाडीचे आर. सी. बुक दोन्ही बाजूचे.

### दरमहा नियमित हप्ता भरल्यानंतर क्लेम (व्याज परतावा) साठी आवश्यक कागदपत्रे

* नियमित कर्ज हप्ता भरलेले स्टेटमेंट * उद्योग / शॉपचे २ फोटो. (व्यवसायासोबतचा फोटो)



## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा





# लोकमंगल बँक

**लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर**

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, शोभा नर्सिंग होम शेजारी, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०१/०२



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, द. सोलापूर.

आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत कृषि विभागाची महत्वाकांक्षी योजना

**केंद्र शासन सहाय्यित**

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

## खाद्यपदार्थ प्रक्रिया (Food Processing) अंतर्गत उद्योग







खवा उद्योग मशीन ३५ टक्के अनुदान



बटाटा चिप्स उद्योग ३५ टक्के अनुदान

१) बेकरी उद्योग
२) केळीचे चिप्स निर्मिती उद्योग
३) बिस्किट निर्मिती उद्योग
४) पोहा निर्मिती उद्योग
५) काजू प्रक्रिया उद्योग
६) ब्रेड/टोस्ट निर्मिती उद्योग
७) केक निर्मिती उद्योग
८) पेढा निर्मिती उद्योग
९) कोकोनट मिल्क पावडर उद्योग
१०) कस्टर्ड पावडर निर्मिती उद्योग
११) दलीया निर्मिती उद्योग
१२) डाळमिल
१३) पिठाची गिरणी
१४) फ्रेंच फ्राय निर्मिती उद्योग
१५) फ्रुट ज्युस निर्मिती उद्योग
१६) अद्रक – लसुण पेस्ट निर्मिती उद्योग
१७) विविध तेल (तेलघाणा लाकडी/यांत्रिक)
१८) हिंगनिर्मिती उद्योग
१९) मध निर्मिती उद्योग
२०) जैम व जेली निर्मिती उद्योग
२१) लिंबू शरबत निर्मिती उद्योग
२२) नुडल्स/शेवई निर्मिती उद्योग
२३) पनीर/चिज निर्मिती उद्योग
२४) पापड निर्मिती उद्योग
२५) लोणचे निर्मिती उद्योग
२६) आलू चिप्स निर्मिती उद्योग
२७) हळद / मसाले निर्मिती उद्योग
२८) टोमैटो प्रोसेसिंग उद्योग

# सदर उद्योगांकरिता ३५% अनुदान उपलब्ध आहे.



पेढे उद्योग ३५ टक्के अनुदान

* इच्छुक लाभार्थ्यांनी आपली आवश्यक कागदपत्रे खालीदर्शवलेल्या संसाधन व्यक्ती यांच्याकडे जमा करावी.
* तुमचा बँकेचा प्रस्ताव संबंधित संसाधन व्यक्ती तयार करतील. तसेच उद्योग स्थापनेबाबत मार्गदर्शन करतील.
* उद्योग स्थापन झाल्यावर अनुदान प्रस्ताव तयार करून अनुदान तुमच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया करतील.

जर वरील यादी पैकी कोणताही उद्योग आधीच अस्तित्वात व वापरात असेल तर, त्या उद्योगाचे विस्तारीकरण करण्यासाठी अर्ज करता येईल व विस्तारीकरण पूर्ण केल्यानंतर अनुदान सुध्दा भेटेल.



मिरची पावडर मशीन उद्योग ३५ टक्के अनुदान



हळद प्रक्रिया उद्योग ३५ टक्के अनुदान
(जास्तीत जास्त दहा लाख रुपये अनुदान)

**लाभार्थी :-**

१) वैयक्तिक लाभार्थी (शेतीची अट नाही)
२) गट लाभार्थी (महिला व पुरूष गट)
३) शेतकरी उत्पादक कंपनी (FPO)
४) भागीदार संस्था

**आवश्यक कागदपत्रे**

१) पॅन कार्ड
२) आधार कार्ड
३) लाइट बिल किंवा रेशन कार्ड
४) बँक पासबुक
५) मशिनरी कोटेशन



# अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार, द. सोलापूर.

# लोकमंगल बँक

अखंड गतीतून सार्थकता

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित मुंबई ७१

# तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्या.

(इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.)

**₹ १५ लाखापर्यंत कर्जास**
**१२%* व्याज परतावा**
(* नियम व अटी लागू)

## सर्व प्रकारच्या व्यवसाय वाढीसाठी व व्यावसायिक वाहन खरेदीकरिता

### वैयक्तीक व्याज परतावा योजना

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* या योजनेची मर्यादा रू. १ लाख ते १५ लाखापर्यंत आहे.
* १५ लाखाच्या कर्जास ४.५ लाख व्याज परतावा करण्यात येतो.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.
* व्याज परतावा जास्तीत जास्त १२% दिला जातो.

### कर्ज कोणाला -

* कृषी सलंग्न पारंपारिक उपक्रमासाठी
* लघु मध्यम उद्योगासाठी
* उत्पादन, व्यापार, विक्री व सेवाक्षेत्रासाठी
* सदर कर्ज योजना प्रामुख्याने ओबीसी प्रवर्गाकरिता आहे.
* वयोमर्यादा १८ ते ५० असावे. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवाशी अनिवार्य आहे.
* कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे.
* या योजनेत नवीन व्यवासाय सुरूवात करण्यासाठी व सध्या सुरू असलेला व्यवसाय - उद्योगवाढीसाठी घेतलेल्या कर्जास व्याजाचा परतावा दिला जातो.

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे -

* सध्या राहत असलेल्या ठिकाणाचा पुरावा. * आधारकार्ड दोन्ही बाजू झेरॉक्स
* पॅनकार्ड * रेशनकार्ड दोन्ही बाजूस * कुटुंबाचा उत्पन्नाचा तहसिल दाखला
* ओबीसी जातीचा दाखला (तहसिलदार)
* आधार व पॅनकार्ड वरील जन्मतारीख एकसारखी असावी.

### गटप्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एलएलपी कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.
* या योजनेअंतर्गत किमान १ किंवा २ पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटांनी एकत्र येऊन
▸ दोन व्यक्तींसाठी व गटासाठी रू. १० ते ५० लाखांच्या मर्यादेवर
▸ गटातील लाभार्थ्यांचे किमान वय १८ ते ४५ असावे.

गटातील लाभार्थ्यांचे कर्जखाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य. या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

* जास्तीत जास्त रू. १५ लाखापर्यंत व्याज रकमेचा परतावा.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.

### १ लाखापर्यंतचे थेट कर्ज योजना

* अर्जदाराचे वय १८ ते ५५ असावे. * अर्जदाराचे सिबील स्कोर ७०० असावे.
* वार्षिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागाकरिता रू. १ लाख
* नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये मुद्दल रु. २०८५/- परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर द. सा. द. से. ४% व्याजदर आकारण्यात येईल.

## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा



मा. आ. सुभाष (बापू) देशमुख

# लोकमंगल बँक

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

## लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०३/६६



# तुमच्या प्रगतीला... आमचं आर्थिक पाठबळ...!

## वसंतराव नाईकविमुक्त जाती व भटक्या जमातीविकास महामंडळ

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

**(इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.)**

**₹ १५ लाखापर्यंत कर्जास**
**१२%* व्याज परतावा**
(* नियम व अटी लागू)

## सर्व प्रकारच्या व्यवसाय वाढीसाठी व व्यावसायिक वाहन खरेदीकरिता

### वैयक्तीक व्याज परतावा योजना

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* या योजनेची मर्यादा रू. १ लाख ते १० लाखापर्यंत आहे.
* १५ लाखाच्या कर्जास ४.५ लाख व्याज परतावा करण्यात येतो.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.
* व्याज परतावा जास्तीत जास्त १२% दिला जातो.

### कर्ज कोणाला –

* कृषी सलंग्न पारंपारिक उपक्रमासाठी
* लघु मध्यम उद्योगासाठी
* उत्पादन, व्यापार, विक्री व सेवाक्षेत्रासाठी
* सदर कर्ज योजना प्रामुख्याने भटक्या विमुक्त जमातीकरिता आहे.
* वयोमर्यादा १८ ते ५० असावे. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवाशी अनिवार्य आहे.
* कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाखाच्या आत असावे.
* या योजनेत नवीन व्यवासाय सुरूवात करण्यासाठी व सध्या सुरू असलेला व्यवसाय – उद्योगवाढीसाठी घेतलेल्या कर्जास व्याजाचा परतावा दिला जातो.

### पात्रता प्रमाणपत्र (LOI) काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे –

* जातीचा दाखला * उत्पन्न दाखला * रेशन कार्ड * शाळा सोडल्याचा दाखला
* आधार कार्ड * कोटेशन * पत्ता पुरावा * रहिवासी दाखला * बँक पासबुक
* लायसन्स (वाहनाकरिता) * डेअरी हमीमत्र (दुग्ध व्यवसायाकरिता )

### गटप्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना

* ऑनलाईन अर्ज प्रक्रिया परिपूर्ण अर्जानंतर (LOI) मिळेल.
* बँक कर्ज मंजुरीनंतर कर्जाचे हप्ते नियमित व वेळेवर भरल्यास व्याज परतावा मिळेल.
* भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एलएलपी कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.
* या योजनेअंतर्गत किमान १ किंवा २ पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटांनी एकत्र येऊन

▸ दोन व्यक्तींसाठी कमाल रू. १५ लाखांच्या मर्यादेवर
▸ गटातील लाभार्थ्यांचे किमान वय १८ ते ४५ असावे.
▸ गटातील लाभार्थ्यांचे कर्जखाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य.

या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

* जास्तीत जास्त रू. १५ लाखापर्यंत व्याज रकमेचा परतावा.
* व्याज परताव्याचा कालावधी ५ वर्षे आहे.

### १ लाखापर्यंतचे थेट कर्ज योजना

* अर्जदाराचे वय १८ ते ५५ असावे. * अर्जदाराचे सिबील स्कोर ७०० असावे.
* वार्षिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागाकरिता रू. १ लाख
* नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये मुद्दल रु. २०८५/– परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर द. सा. द. से. ४% व्याजदर आकारण्यात येईल.

## अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेशी संपर्क साधा

# लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ

# लोकमंगल अन्नपूर्णा योजना

॥ अखंड गतीतून सार्थकता ॥

**जीवनाचे संचित, तृप्त करू या वृद्ध वंचित !**



तुम्ही देणगी अथवा धान्य स्वरूपात
अन्नपूर्णा योजनेस मदत करू शकतात

| | |
|---|---|
| **१८२५०/-** एका लाभार्थ्याचा एक वर्षाचा खर्च | **२७५००/-** ५५० लाभार्थ्यांचा एक दिवसाचा खर्च |
| **७६५००/-** ५१ लाभार्थ्यांचा एक महिन्याचा खर्च | **८२५०००/-** ५५० लाभार्थ्यांचा एक महिन्याचा खर्च |

## धान्यरूपी देणगी स्वीकारली जाईल

| प्रति महिना | |
|---|---|
| गहू | २४०० किलो |
| तांदूळ | १०२० किलो |
| गोडेतेल | ३४५ किलो |
| तूरडाळ | ४५० किलो |

**लोकमंगल बँक**
A/c No. 0020 0111 2000 1713
IFSC Code : IBKL0478LOC

**AXIS BANK**
A/c No. 2660 1010 0040 017
IFSC Code : UTIB0000266

'अन्नपूर्णा' १३-अ, सह्याद्री हाऊसिंग सोसायटी,
जुना होटगी नका, विकास नगर, सोलापूर - ४१३००३